# ॥ चैतन्य लहरी ॥



सन १९९४ -९५ अंक क्र. ४

## ॥ अवघे धरू सुपंथ ॥

एक मेका साह्य करूनी अवघे धरू सुपंथ ।
अवघे धरू सुपंथ, अवघे धरू सुपंथ ॥धृ॥

पंथराज हा सहज योगाचा
कुंडलिनीला जागविण्याचा
आत्मतत्वाला अनुभवुनिया
चैतन्याला मिळविण्याचा ॥१॥

एक मेका साह्य - - - - - -

जन्मो जन्मी आपुलया शरीरी
कुंडलिनी माँ सुप्त राहिली
वाट पाहते जागविण्याची
अंतरंग ते प्रकाशण्याची ॥२॥

एक मेका साह्य - - - -

निर्विचारता मनास शांती
संतुलनातुनी शशिरास्वास्थ्य
प्रेम भावना हृदयी जागे
निरानंदी चित्त रंगे ॥३॥

एक मेका साह्य करूनी - - - -

## ॥ निर्मला योगेश्वरींना ॥

निर्मला योगेश्वरींना प्रेमभावे वंदना
हृदयी त्यांना स्थापुनिया भक्ति भावे अर्चना ॥धृ॥

मातेच्या श्री चरणी येऊनी आत्मरूपी रंगला
लाभूनी नवचेतनेला निर्मल तो जाहला
सहस्त्रकोटी निर्मलांची प्रेममयी ही माऊली
हृदयी त्यांच्या वास करूनी धरी कृपेची साऊली ॥१॥

व्यापुनिया सृष्टी सारी पूर्ण परी जी राहिली
मातृ रुपे कारूण्याने अवतरी ती भुतली ॥२॥

पूर्ण शक्ति पूर्ण रूपा पूर्ण ब्रम्हस्वरूपिणी
पूर्णा मधुनी पूर्ण येऊनी पूर्ण ती अवशिष्यली ॥३॥

सहजदायिनी सुजनरक्षिणी त्रिभुवने संचारिणी
प्रेमवर्धिनी दुखःहरिणी सहजमोक्ष प्रदायिनी ॥४॥

# श्रीकृष्ण पूजा

## सारांश २८ ऑगस्ट १४ कबेला : इटली

श्रीकृष्ण हे श्रीविष्णुचे अवतार आहेत आणि श्रीविष्णु हे साऱ्या सृष्टीचे पालनकर्ते आहेत. या ही सृष्टी जेव्हां निर्माण झाली तेव्हां तिचा सांभाळ करायला कोणी असणे जरूरीचं होतं कारण त्याशिवाय तिचा नाश झाला असता. तिचा असा सांभाळ करणारा कोणी नसता तर या मनुष्यप्राण्यांनी त्यांच्या स्वभावानुसार केव्हाच नाश करून टाकला असता. उत्क्रान्तीच्या प्रक्रीयेमध्यें त्यांनी वेगवेगळी रूपे धारण केली. त्यांनी आपल्या अवती भोवती थोर सत्पुरुषांचं वातावरण तयार केले, जेणेंकरून या सृष्टीमधें धर्माचे पालन होईल. अर्थात या पालनक्रियेचा मूलभूत आधार धर्म होता. या धर्मानुसार जे कांही प्रस्थापित होणार होते ते संतुलनामधूनच होणार होते. एरवी सामान्य माणसांची वृत्ति कुठल्याही बाबतीत टोकाला जाण्याची असते.

धर्माचे प्रथम महत्त्वाचे कार्य म्हणजे हे संतुलन निर्माण करणें. ज्या माणसामधें संतुलन नसते तो उन्नत होऊं शकत नाहीं. ज्याप्रमाणें जहाजामधें जर एकसारखं वजन नसेल तर ते हालणार नाही. त्याचप्रमाणें मानवप्राण्यांनी प्रथम संतुलनात राहणं शिकलं पाहिजे. आता माणसा - माणसांमधे वेगवेगळी क्षमता व प्रावीण्य आहे. "या देवी सर्वभूतेषु जाति रुपेण संस्थिताः" असं म्हणटलं आहे. म्हणजे वेगवेगळ्या तऱ्हेच्या वृत्ति असतात. माणसांमध्ये जन्मतःच निरनिराळ्या आवडी, निरनिराळे चेहरे, निरनिराळे रंग असतात. यांच कारण विविधता निर्माण व्हायला हवी होती. सगळेचजण जर एकसारखे दिसणारे झाले असते तर सर्वजण यंत्र - मानवासारखे दिसले असते. म्हणून देशाप्रमाणें आणि अनुवांशिकतेप्रमाणें प्रत्येकजण वेगळा असा निर्माण केला गेला. हे सर्व या श्रीविष्णुतत्त्वांतून घडवून आणलं आणि सृष्टीमध्ये विविधता निर्माण झाली. श्रीकृष्ण सर्वांचे आधार आहेत. श्रीकृष्णांच्या काळामधे लोक गंभीर वृत्तीचे आणि कर्मकाण्डांत गुंतलेले होते. कारण त्याआधी श्रीराम आले आणि त्यांनी "मर्यादा" घालून दिल्या. या मर्यादांमुळे नंतर लोक गंभीर व तापसी बनले व त्या वातावरणांत ते ही विविधता व त्यांतील सौंदर्य आणि आनंदाला पारखे झाले.

श्रीकृष्णांचा अवतार संपूर्ण होता. चन्द्राला ज्याप्रमाणे सोळा कला आहेत. त्याप्रमाणें त्यांना पण सोळा पाकळ्या होत्या म्हणून ते संपूर्ण होते, पौर्णिमेच्या चंद्रासारखे होते. अशा पूर्णावस्थेमुळे ते श्रीविष्णुचे पूर्णावतार होते व म्हणून त्याचा आविष्कार झाला. श्रीरामांच्यावेळी जे कांही कमी पडलं ते सर्व भरून आलं. तुमच्या उजव्या हृदयाला बारा पाकळ्या आहेत. त्यामधून त्यांनी बऱ्याच गोष्टी दाखवल्या ज्यांचा माणसांना पुरा विसर पडतो. भगवद्गीता सांगितल्यावर लोक तो ग्रंथ समजू लागले. श्रीकृष्णांनी अर्जुनाला सांगितलं "या वेळी तुला धर्माकरता व सत्याकरतां लढलंच

पाहिजे." अर्जुन म्हणाला "मी माझ्याच बांधवांना आणि नातलगांना ठार मारू शकत नाहीं. " त्यावर ते म्हणाले "तूं कोण त्यांना मारणारा आहेस? ते आधींच मेलेले आहेत कारण त्यांनी धर्मच पाळला नाही." तुमच्यांत जर धर्म नसेल तर तुम्ही मेल्यासारखेच होता. मग ठार करणें किंवा न करणं याला अर्थच रहात नाहीं. आणि आपल्याला आज हेच दिसून येत आहे.

हा उपदेश कुरुक्षेत्रामध्यें अर्जुनाला सांगितला. मग तो म्हणाला, "मी धर्म पाळणारा असल्यामुळें मला तू या लेकांना मारायला सांगत आहेस तर मी त्यांना मारीनच. पण पुढं काय?" मग श्रीकृष्णांनी सहजयोग समजावून सांगितला दुसऱ्या अध्यायांत त्यांनी स्थितप्रज्ञ माणसाची लक्षणं सांगितली ती अशी कीं स्थितप्रज्ञ हा नेहमी संतुलनात असतो, तो क्रोधाच्या आहारी जात नाहीं आणि आंतून तो पूर्णपणें शांत असतो. खरे म्हणजे त्यांनी सांगितलेल सर्व आजही लागू आहे. म्हणजेच त्यानी एकप्रकारे सहजयोगच सांगितला. माणसाने काय बनायला हवं ते सांगितलं ते कसं ते मात्र सांगितलं नाहीं. त्यावेळी कौरव - पांडवांच युध्द चालू होतं - त्याच वेळी रणभूमीवरच त्यांनी सांगितलं कीं जर तूं स्थितप्रज्ञ झालास तर सर्व प्रश्न मिटतील, तुझ्या सर्व भ्रामक कल्पना संपतील आणि तूं तुझ्याच अंतःकरणांत शांति मिळवशील.

[आजकालच्या काळांत आपल्याला कौरवांशी युध्द करायचं नाही, तर पाच पांडवांना कौरवांशी लढायचं आहे. हे पांच पांडव कोण? तर ते म्हणजे आपली पांच इंद्रिये जी सृष्टीच्या मूलतत्त्वांतून निर्माण झाली. त्यांना आपल्या अंतरंगातील कौरवांबरोबर लढायचं आहे. असे शंभर कौरव आहेत. म्हणजे निसर्गालाच निसर्गाविरुध्द शक्तींबरोबर लढायचं आहे.] लोक म्हणतात राग येणं स्वाभाविक आहे, वर्चस्व गाजवणं नैसर्गिक आहे, पण आता आपण समजून घेतलं पाहिजे कीं आपल्यामध्यें उन्नत होण्याची उपजत क्षमता आहे, वरच्या स्थितीला पोचणं स्वाभाविक आहे, सहजयोगी बनणं स्वाभाविक, सहज प्रवृत्ति आहे. त्यासाठी आपण जन्मतःच सज्ज आहेत. आतां एक साधी बी पहा, तिला कोंब फुटतात व त्याचा वृक्ष बनतो. अर्थात त्या बीजामध्यें कालान्तराने हजारो वृक्ष बनण्याची क्षमता सहजच सामावलेली आहे. आता शास्त्रज्ञ मंडळी एकाच 'बी' ला हजार कोंब फुटतील व त्यांच्यापासून वृक्ष - वनस्पती बनतील अशा प्रकारचं संशोधन करीत आहेत.

स्थितप्रज्ञ बनलं पाहिजे असं जेव्हा श्रीकृष्ण म्हणाले तेव्हां त्यांना हेच म्हणायचं होतं की तुम्ही संतुलन साधलं पाहिजे. हे त्यांनी युध्द चालु असतानांच सांगितलं. आता तुम्हाला शत्रूंबरोबर युध्द करावंच लागलं आणि त्याला ठार करावं लागलं तरी कांही बिघडत नाहीं, पण त्यातून पार पडल्यानंतर तुम्ही अध्यात्मिक उंची मिळवायची वृत्ति विकसित केली पाहिजे.

[ही अध्यात्मिक उंची मिळवणें हे आपल कार्य आहे आणि ते आपल्याला केलं पाहिजे. नुसतंच धर्माच काम नाहीं, बऱ्याच सहजयोग्यांना वाटतं की ते धार्मिक झाले आहेत व त्याचंच कार्य करत आहेत. पण एवढंच नुसतं करून भागणार नाहीं हा संतुलनाचा भाग झाला. त्याच्याही पुढें जाऊन तुम्ही तुमच्या आत्म्याच्या जाणिवेत विकसित व्हायला हवे आणि त्याचा प्रसार झाला पाहिजे.] श्रीकृष्णांनी हेच कार्य केलं कारण संपर्कक्षम होते. तुम्हाला माहीत आहेच की अमेरिकेचे संबंध जगभर आहेत, त्याचा चुकीच्या गोष्टींसाठी वापर होत आहे हे वेगळं. त्यांच्याजवळ कॉम्प्युटर आहेत. सर्व संपर्कसाधने त्यांनी विकसित केली आहेत कारण संपर्क वाढवणें हा त्यांचा स्थायीभाव आहे. पण त्यांचा श्रीकृष्णावर विश्वास नाहीं व धर्माला पण ते मान देत नाहींत. आणि म्हणूनच त्यांचा पाया सदोष आहे. या पायाभूत दोषांमुळे त्यांनी वाईट आणि घाणेरड्या गोष्टी पसरवल्या आहेत. ज्या परमेश्वराच्या विरोधांत, तर आहेतच पण त्यांच्याच उन्नतीच्या पण विरोधांत आहेत. तरीही ते हे सर्व करत आहेत. करू नये अशा या गोष्टी ते का करतात? मला वाटतं की याला कारण बुध्दि, बुध्दि म्हणजेच मेंदू, हे विराटाचं स्थान आहे. या बुध्दिमुळेंच

अधार्मिक असणं स्वाभाविक आहे असं त्यांना वाटतं. वर्चस्व गाजवणं पैशाच्या मागें लागणं हेसुध्दां त्यांना नैसर्गिक वाटतं. त्यांच्याजवळ जे कांही आहे ते नैसर्गिकच आहे असं त्यांच म्हणणं, कारण त्यांच्या बौध्दिक चातुर्याचा उपयोग करून त्यांनी तुम्हाला कसं कोण जाणे पटवलं आहे की ते म्हणतात तेच बरोबर आहे आणि त्याशिवाय तुमचं चालणार नाहीं. हीच त्यांची संस्कृति आहे. तीच संस्कृति सगळीकडे पसरली आहे आणि जड असलेल्या बुध्दीमुळें ते सर्वजण मानतात. जो मनुष्य सदैव पैशाविषयीच विचार करत असतो तो कालान्तरानें हुशार बनतो, चाणाक्ष बनतो. इतका की त्याला वाटतं की त्याला सगळं कांहीं समजल आहे. तशी त्याची किंबहुना खात्री असते. त्याच्या म्हणण्याप्रमाणें तो जे करतो किंवा जसा वागतो ते सर्व बरोबरच आहे.

हे जे पाच पांडव त्यांच्यामधें आहेत त्याचा उपयोग परमेश्वराच्या विरुध्द किंवा विनाशकारी गोष्टींकरताच तो करतो. त्याला हे लक्षांतही येत नाहीं कारण बौध्दिक चातुर्यातून अधार्मिक गोष्टींचं समर्थन शोधण्याची त्याची संवयच असते. उदा. श्रीकृष्णाला आधीं पांच बायका होत्या व नंतर सोळा बायका केल्या ह्याच गोष्टी श्रीकृष्णाच्या जीवनाबद्दल बोलताना ते सांगतात वास्तविक ह्या सर्व त्याच्या शक्त्या होत्या. श्रीकृष्णांना खऱ्या अर्थानें समजून न घेता या जडवादी बुध्दीच्या उपयोगामुळें त्यांची विचारसरणी चुकीकडे चालते. प्रत्येक चुकीचं समर्थन करण्याच्या संवयीमुळें तुमची विचारसरणी चुकीच्या बाजूकडे वाहवते. या संवयीमुळे तुम्ही स्वार्थी बनत जाता. एरवी तुम्ही अधार्मिक, वर्चस्व गाजवणाऱ्या आणि युध्दपिपासू लोकांबरोबर राहूंच शकणार नाहीं. मानवाकडून जे खरोखर अपेक्षित आहे त्याच्या अगदी उलट प्रकार या पाश्चात्य संस्कृतीत आहेत. अनैतिकतेचंही ते कसं समर्थन करतात हे पाहूनच तुम्हाला हे समजेल.

ख्रिस्त हे मोहम्मदसाहेबांपेक्षा कडक स्वभावाचे होते. जो कोणी डोळ्यांचा चुकीचा उपयोग करतो त्याचे डोळेच काढा इतक ते म्हणायचे, जो कोणी हाताचा दुरूपयोग करेल त्याचा हात कापा असं ते म्हणायचे. ख्रिस्तांच्या म्हणण्याप्रमाणें बहुतेक युरोपीयन आणि अमेरिकन माणसांना एक हात गमवावा लागला असता. पुरूषां करतां ख्रिस्तांनी खूप कांही केलं आता महिलां करतां कांही करायला हव असं मोहम्मदसाहेब म्हणायचे. बायकांकडे सारखी नजर वळवणें ह्यांतही कांही गैर नाहीं असंही म्हणणारे आहेत. आता पशू सुध्दां नैसर्गिक प्राणी आहे पण ते असं वागताना तुम्ही कधी पाहिलं आहे? हे (पाश्चात्य) लोक जनावरांपेक्षाही खालच्या दर्जाला गेले आहेत आणि आपणही त्या विद्वानांच्या चुकीच्या समजुतीच्या आहारी जाऊन नाना तऱ्हेचे प्रश्न निर्माण करून ठेवले आहेत.

एखाद्या बुध्दीमान माणसाकडून निर्माण झालेला प्रश्न म्हणजे तो सर्वांवर सर्वस्व गाजवायचा प्रयत्न करतो. उदा. एखादी नवीन फॅशन आली की लगेच आपण त्याचा स्वीकार करतो. एखादा हुशार धंदेवाईक तुम्हाला केव्हां फसवेल तुम्हाला समजणार नाहीं, पण जे सूज्ञ आहेत ते फसणार नाहींत, ते म्हणतील "तुमचं आतां खूप झालं." हा नैतिकतेचा भाग झाला. पाश्चात्य देशात हे फार चालतं. अगदी जनावरांच्याही पलीकडे आणि म्हणूनच त्यांना आतां रोग, समस्या, भानगडी वगैरेचा त्रास होत आहे.

दुसरी गोष्ट म्हणजे आपण विध्वंस करणाऱ्या गोष्टींचं समर्थन करतो. आतां कुरूक्षेत्रावर कुठलं युध्द होत नाहीं पण विध्वंस व दंगेधोपे सगळीकडे चालू आहेत. अमेरिकेत तर भयंकरच फक्त अमेरिकेतच असं नाहीं तर जगांत सर्वत्र तेच चालू आहे कारण सर्वांची अमेरिका ही गुरूच आहे. हे अमेरिकेत सुरू होतं व लोक त्याचे अंधानुकरण करतात. आतां चित्रपटांतही तोच प्रकार. दुसऱ्याचा प्राण घेणं अयोग्य आहे. "तूं कुणाला मारू नकोस" मुसलमान पण तेच करत आहेत, कुणीतरी कुणाला तरी ठार करत आहे. वर्चस्व गाजवण्याच्या या प्रवृत्तीचा शेवट दुसऱ्यांना ठार करण्यांत होतो. तुम्ही मुंगी एवढा लहानसा जीव निर्माण

करूं शक्त नाहीं मग दुसऱ्या एकाद्या मानवाला ठार कसे करूं शकतां? हिटलरच्या वेळीही जीव घेण्याची प्रवृत्ति पराकोटीला गेली, कारण जगांत आपणच सर्वश्रेष्ठ आहेत अशी त्याची समजुत होती. हा शुध्द वेडगळपणा आहे, आपण कोण आहोत हे तुम्ही विसरता आणि तुमच्याच अहंकारातुन आपण कोणी तरी विशेष आहोत ही समजूत करून घेता. सहजयोगातही असे कांही लोक आहेत जे स्वतःला परमेश्वर,देवता समजतात. या अहंकारामुळे तुमच्या बुध्दीची तीव्रता कमी होते. मनुष्याचा सर्वात मोठा शत्रू म्हणजे त्याची बुध्दी आहे कारण ती सीमित आहे, परावलंबी आहे उध्दट आहे आणि आंधळी पण आहे.

सूज्ञता ही कांहीं वेगळीच असते. ही सूज्ञता तुम्हाला आत्म्याकडून मिळते आणि त्यामुळे चूक काय व बरोबर काय याची तुम्हाला पूर्ण जाणीव होते. चुकीच्या गोष्टी बुध्दीतून सहज स्वीकारल्या जातात. तीव्र बुध्दी म्हणजे सूज्ञता नव्हे या दोन अगदी वेगवेगळ्या गोष्टी आहेत. श्रीकृष्ण फार मुत्सद्दी म्हणून ओळखले जायचे. त्यांच्याजवळ दैवी मुत्सद्देगिरी होती. म्हणजे ते फार हुशार व चाणाक्ष होते. मी कांही लोक वरच्या अधिकारपदावर असूनही हुशार नसलेले असे पाहिले आहेत. मला आतां असं वाटतं की बुध्दिमत्ता ही फार धोक्याची आहे. श्रकृष्णांनी बुध्दिमत्ता वापरली. ते खूप शक्तिशाली होते, त्यांच्यावर कुणीही हुकुमत गाजवूं शक्त नव्हते. हा मुद्दा लक्षांत घ्या. तुम्हाला तुमची बुध्दिमत्ता वापरता आली पाहिजे ती तुमच्याच डोक्यावर बसून उपयोग नाहीं श्रीकृष्णांचे वैशिष्टय हेच की त्यांनी त्याची बुध्दिमत्ता मुत्सद्देगिरीने वापरली आणि परमेश्वरी कार्यासाठी वापरली हा फरक असण्याचं कारण म्हणजे आपण आपल्याच बुध्दीचे भावनांचे शरीराचे आणि संवयींचे गुलाम बनुन राहतो. यांच्यावर जेव्हां तुम्ही स्वामित्व मिळवता तेव्हां हीच बुध्दि तुम्ही नीट ओळखूं शकाल. मग तुम्ही या सृष्टीचे बादशहा आहात अशा कल्पना तुम्हाला बुध्दीतूनच मिळतील किंवा त्याच बुध्दीतून तुम्ही कोणीच नाही हीं पण कल्पना येऊ शकेल ही बुध्दी तुमच्यावर अनेक तऱ्हेनें परिणाम करते.

तुम्ही सहजयोगी आहात म्हणून तुम्ही तुमच्या बुध्दीपेक्षा तुमच्यांतील सूज्ञतेकडून मार्गदर्शन मिळवा. तुमच्यातील चैतन्य लहरींमधून हे ओळखा व तुमच्या हिताच काय आहे किंवा अपायकारक काय आहे समजून घ्या. मानवप्राणी असल्यामुळे त्यांतून कांही बौध्दिक गोष्टी पण तुम्हाला समजायला लागतील, सहजयोगांत असल्यामुळें बुध्दीकडून होत असलेल्या प्रक्रिया तुम्ही पारखू शकाल. मुख्य म्हणजे तुम्ही सूक्ष्मात उतरायला हवं आपल्याला ही बुध्दि कुठुन मिळाली हे बघा. ती जेव्हां आपला मेंदू कार्यान्वित झाला तेव्हांच निर्माण झाली. कांही मुलं पण खूपच हुशार असल्याचं मी पाहिलं आहे. मेंदूची खूप वाढ झाली आईवडीलही हुशार असले. अनुवांशिक हुशारी असली तर मुलंही हुशार होतात. किंवा परिस्थितिरूपही होतात. जसं तुम्ही एकाद्या विशिष्ट देशांत जन्माला आलात तर तुम्ही एकाएकीं बुध्दीवान बनता. अमेरिकन व इंग्लिश लोक सारखं वाचन करत असतात. पण या सगळ्या वाचनातून काय मिळवतात? प्रत्येक पुस्तक त्यांना वाचायला लागतं. कॉम्प्यूटर्समधें ते तरबेज आहेत. ही सर्व अविद्या आहे.हे ज्ञान नव्हे हे अज्ञान आहे त्यांना प्रत्येक गोष्टीबद्दल पुर्ण ज्ञान झालं आहे अशा समजूतीमुळे ते स्वतःला फार विद्वान समजतात.

या बुध्दीतून जेव्हां जाणीव प्रगत होते तेव्हां निरनिराळ्या कल्पना निर्माण केल्या जातात. अमेरिकेत मुख्यतः केवळ पैसा उपटण्याकरतां लोक चित्रविचित्र कल्पना वापरतात. उदा. ते गॉलिवॉग (golliwog) चा वाढदिवस साजरा करतात., त्यावेळी लोक मोठ्या पार्ट्या पण देतात. त्यानंतर त्यांनी कुत्र्यांचा वाढदिवस साजरा करायची प्रथा सुरू केली. त्यांच्या डोक्यांत कुणीतरी नवनवीन प्रकार भरवीत असतो. मेल्यानंतर तुम्ही कुठला सूट अगर कुठला टाय अंगावर ठेवणार हे कळवून तशी व्यवस्था करणाऱ्या संस्था पण तेथें आहेत. तसेच कशा तऱ्हेची दफन-

पेटी हवी हे पण, तसेच बर्फाची व्यवस्था करायला सांगणारे लोक आहेत म्हणजे ते तिथें पोचूं शकतील. सगळ्यांत वाईट गोष्ट म्हणजे युरोपात सुट्टीवर ट्रीपला जाण्याच्या कल्पनेचा प्रचार आणि प्रसार जाहिरातींमधून केला जात आहे. इटलीमध्ये एकाद्याला अशा सुट्टीकरतां कुठें जाणं जमलं नाही तर आयुष्यांत फार मोठं संकट आल्यासारखं त्याला वाटतं. या प्रकारांत सुट्टीवर समुद्रकिनारी जाणें अंगाचावर्ण सुर्यप्रकाशांत काळवंडून घेणें , हॉटेलमधे रहाणें ह्या गोष्टी होतात. बाहेर पडलंच पाहिजे असंच म्हणतात. समुद्रकिनाऱ्याची शोभाच ते घालवतात. वडिलांसारखा असणाऱ्या सागराबद्दल त्यांना आदर नाहींच पण एकमेकांबद्दलही आदराची भावना नाहीं.

बायकांना बारीक व्हायचं असतं आणि सुंदर दिसायच असतं म्हणून ते तिथें नग्नावस्थेत असतात तिथें जे काय चाललं ते अगदी खराब आहे. तुम्ही खरंच जर बुध्दिवान असाल तर हे सर्व तुम्हाला कसं चालतं?

सहजयोगांतील अर्थशास्त्र हें पण वेगळंच आहे. प्रचलीत अर्थशास्त्रामधील चित्रविचित्र नियम कल्पना सहजयोगामधें बसत नाहीत. ते सर्व धंदा वाढवण्याचे व गैरफायदा घेण्याचे खेळ आहेत. लोकांना आकर्षित कसं करायचं, आपला माल कसा खपवायचा वगैरे वगैरे. हे सर्व एक प्रकारचं आर्थिक वर्चस्व गाजवण्याचे प्रकार.

श्रीकृष्ण राजा होते. त्यांनी राजवैभव उपभोगलं तसंच गोकुळांत अगदी साध्यासुध्या धरकुलात राहिले. त्यांना कशाचंच बंधन नव्हतं. म्हणून ही पैशा बद्दलची आसक्ति प्रथम लक्षात घ्या पैसा मिळत असेल तर इतर सर्व मान्य असं समजूं नका. भारतांत आम्ही एकदां एका हॉटेलमधें जेवायला गेलो. आमच्याबरोबर कांही अमेरिकन मित्र होते. त्यांचा आहार मोठा असतो आणि त्यांनी बरच कांही खाल्लं आणि आम्ही त्याबाबतील कमी पडत होतो. त्यांनी वेटरला बोलावलं आणि उरलेले पदार्थ बांधून द्यायला सांगितले कारण त्यांनी त्याचे पैसे दिले होते. त्याबद्दल त्यांना लाजपण वाटली नाहीं. मी म्हणाले की भारतात असलं कांही कोणी करत नाहीं कारण ती असभ्यता मानली जाते. ते म्हणाले "पण आम्ही त्याचे पैसे मोजले आहेत एकदा पैसे मोजल्यावर त्याला असभ्यता कां म्हणायचं?" सहजयोगांत तुमची कद्रूवृत्ति चालत नाही. तुम्ही नेहमीं उदार राहिलं पाहिजे आणि दातृत्व ठेवलं पाहिजे दुसऱ्याबद्दल तुमच्यात आपलेपणा हवा. अशा वागण्यातुनच आपलं व्यक्तिमत्व कळूं शकतं. आणि अशा उदार वागणुकीतून तुम्हाला फार मोठेपणा मिळणार आहे असेही नाही.

पण सगळ्यात वाईट म्हणजे हॉलिवुड आणि तेथील सिनेमा-सृष्टि. पुरूषांच्या नांवाखाली तिथल्या नट्या काय नाहीं करत? अशा स्त्रीला नरकांत सुध्दां जागा मिळणार नाहीं, तिथें तिला कुठें ठेवणार? हे सर्व प्रकार धर्माच्या आणि संपर्कक्रियेच्या अगदी विरूध्द आहेत.

तुम्ही इतरांशी संबंध कसे जोडाल? अगदीं सभ्यपणें, मृदु आणि मधुर वागण्यांतुन तुम्ही त्यांच्याशी आणि इतर सहजयोग्यांशी बोलायला हवं दुसऱ्याशी बोलतांनाही तुमची वागणूक गोड हवी. फ्रेंच लोकांसारखी कृत्रिमता नको. तुमचं संभाषण नम्रपणें व सभ्य तऱ्हेनें हवं. सारखी गडबड आणि आपलीच वटवट कामाची नाहीं. माधुर्य ही श्रीकृष्णांची शक्तिच होती. अगदीं मधाळ, दुसऱ्याला आनंद वाटेल असं बोलण्याचं तुम्ही लक्षांत ठेवलं पाहिजे दुसऱ्याशी बोलताना हळुवार व गोड शब्द वापरून त्याला आनंद वाटेल असं बोलावं दुसऱ्याला लागेल किंवा चिडवण्यासारखी भाषा नको. कांही लेकांना दुसरा नेहमी चिडेल असंच बोलायची संवय असते ते बरोबर नाहीं. आता कांही लोक त्यांच्या मतलबापूरतं गोड वागतात. इतर वेळी मग ते रोखठोकपणा दाखवतात. भारतातले जैन समाजातले लोक त्यांच्या स्वार्थासाठी अगदी गोड-गोड वागतील पण इतर वेळी, दान देण्याच्या वेळीं अगदी उलट!

श्रीकृष्ण या बाबतीत अगदीं वेगळे होते. आयुष्यभर ते विदुराचे, जो एका नोकराणीचा मुलगा होता पण साक्षात्कारी होता, पाहुणे असायचे. विदुराच्या साध्यासुध्या घरीं श्रीकृष्ण रहायचे आणि तिथलं साधं भोजन घ्यायचे. दुर्योधनाच्या राजमहालांत ते कधींच जात नसत. त्यांनी पैशाची कधीच पर्वा केली नाहीं किंवा काळजी केली नाहीं. राज्य, राजाची गादी आणि पैसा या सर्वांपासून ते अलिप्त राहिले. एकदां तुम्ही गुंतलात की मग पैशापासून होणाऱ्या सर्व यातना तुमच्यामागे आल्यांच, उलट जर तुम्ही अनासक्त राहिलात तर तोच पैसा तुम्ही (योग्य तऱ्हेने) वापरू शकाल. तुम्ही पैशाचे गुलाम झालात तर तोच पैसा तुमच्याच डोक्यावर बसणार, आजकाल जवळ पैसा असणं धोक्याचं झालं आहे. सफेद प्रक्रिया वाटत आहे आणि त्याचमुळें सगळी तत्त्वं तुमच्या विरोधांत काम करत आहेत. सियेरा नेवाडा (sierra Nevada) मधले लोक म्हणतात " एकदा तुम्ही उद्योगधंदा चालूं केला की तुम्ही कांहीही करूं शकता. हॉलिवूडमधें भयंकर प्रकारचे सिनेमा बनत आहेत आणि त्यात भर म्हणून त्यांना पुरस्कारही मिळत आहेत. एका सिनेमात एक नरभक्षक मनुष्य मानवी मांस खाताना दाखवला आणि सगळेजण मजेत पहात होते. सर्वात चांगल्या सिनेमाला आणि अभिनयाला पुरस्कार देले जातात. एका सिनेमात मेलेल्या माणसांना टांगून ठेवल्याचं दृश्य होतं. लोकांना तरी हे भयानक प्रकार पहायला कसे आवडतात? त्यांची चारित्र्याची कल्पना इतकी खालावली आहे? कुठें भरकटत चालले आहेत हे? खरं म्हणजे खरा मानवप्राणी असेल तर त्याला अशा गोष्टींचा तिटकारा वाटेल.

पहिली मुख्य गोष्ट म्हणजे संपर्ककला, दुसऱ्या लोकांशी तुम्ही संपर्क कसे बनवता हे. प्रथम हे आपापल्या घरांतच, नवरा-बायको-मुलं यामधें, आपापसात सुरू करा. जरा लक्ष देऊन आपण वर्चस्व किंवा हटवादीपणा दाखवतो का हे प्रत्येकानें स्वःच तपासून पहा. पुरूषांचा काय अगर स्त्रियांचा काय, हा वरचढपणा कुठल्याही स्तरा पर्यंत जाऊ शकतो. इथें महिलामध्यें ही प्रवृत्ति जास्त आहे. भारतात पुरुष जास्त वरचष्मा गाजवतो. मनुष्यामधें सर्वांत पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्याचं आचरण व सभ्यता. पण हे सोडून तो चांगले कपडे घालण्याकडे लक्ष देतो. वेशभूषेलाच आचरणामधें महत्त्व, पण हेच लोक एकत्र जमले की सनसनाटी बातम्यांशिवाय दुसऱ्या कशावद्दल बोलण नाही. श्रीकृष्ण कधी असल्या विषयांबद्दल बोलले नाहींत हे समजून घ्यायला हवं. युरोपिअन देशामध्येंच जगातील सर्व सनसनाटीत घटना घडतात हे कसं काय? लोकांना या विषयांबद्दल इतकं आकर्षण का वाटतं? आणि या गोष्टींना प्रसारमाध्यमांतून उत्तेजन मिळतं कारण त्यांना त्यातून पैसा कमवायचा असतो. या धंद्यामधे इतकी हातमिळवणूक केली जाते कीं लोकांना ह्याच वायफळ गोष्टी आवडतात आणि त्याच वर्तमानपत्रातून छापून येतात. सुमारे तीस वर्षांपूर्वी असले प्रकार कुणाला माहितही नव्हते, आणि असल्या विषयांच्या पुस्तकावर बंदी असायची. आता या गोष्टींना इतक पेव फुटलं आहे की कुठलही मासिक किंवा पुस्तक वाचलं तर त्यातुन काय साधलं जात आहे हे कळेनास होतं. ही सर्व विनाशाकडे नेणारी शिकवण आहे. लोकांना ते चालतं आवडतं आणि ते वाढतच जाव या करतां ते स्वार्थी बनून स्त्रियांचा वापर करत आहेत आणि त्या पण मुकाटपणे त्यांचा स्विकार करतात. त्या आपल वर्चस्व गाजवतातच आणि आपण वरचढ आहोत यांचा त्याना अभिमान असतो. एका मासिकांत मी वाचलं की एक स्त्री आपल्या आयुष्यांत चारशे पुरूष होते असं गर्वानें सांगत होती अशा स्त्रियांना नरकात देखील जागा मिळणार नाहीं, तिथें त्यांना कुठं ठेवणार? पैशाच्या मागे लागून आपण पैसा मिळवतो. आणखी मिळवत राहतो आणि मग चोर पळवून नेतात. नवीन-नवीन उद्योग काढणारे कल्पकदार तसे आणखीच वाईट उदा. त्यानी एखाद डिझाईनचं घड्याळ काढलं तरी प्रत्येकजण त्याच्याच मागें धावतो.

श्रीकृष्णाकडे बघा, इतके हुशार की सारं कांही पहात असतात. गंमत करत करत खूबीनें सर्वांना आपलंस करतात. ते

जर कशा बद्दलही आसक्त असते तर त्यांना असं करता आलं नसते. ही कला साध्य करण्याकरता श्रीकृष्णांच्या संस्कृतीच्या विरूध्द असलेल्या सर्व गोष्टींपासून अलग व्हायला पाहिजे. ही फॅशन, ती फॅशन - या सर्व आवडी विनाशकारी आहेत. केसांना कधी तेल लावायचं नाही आणि शेवटी टक्कल पडायचं! त्यांनी जे कांही केलं ते सर्व घातक आणि नको असलेल्या विषयांचा नाश करण्यासाठीच केलं, आणि आनंद - रास - पसरवला. रास ही तुमच्यातील शक्ति आहे आणि त्या शक्तीतून ही क्रीडा खेळा आणि आनंदद मिळवा त्यांनी होळीचा उत्सव खेळला ते फार चांगलं होतं कारण त्यांतून तुमच्या आनंदी वृत्तीचा अविष्कार होतो जे श्रीरामांच्या काळी झालं नाहीं. ते म्हणायचे, "फक्त या आनंदाचा उपभोग घ्या." पण हे सर्व सहजयोग्यांसाठी होतं, इतरांसाठी नाहीं. ते इतर लोक क्लबमधें - बारमधें जात राहतात. श्रीकृष्ण सांगायचे, आणि तसंच करायचे, कीं सर्व काही उपभोग घ्या पण धर्माचे कायदे पाळून. आपण अधार्मिक होऊं नये. धर्माचं पालन करून आनंद मिळवता आला पाहिजे, नाही तर धार्मिक वृत्ती असूनही तुम्ही अगदी शुष्क बनाल, आनंदाला पारखे व्हाल आणि कधीकधी मुर्खपणा कराल. हा आनंद आपल्याभोवतीसुध्दां पसरला पाहीजे. अशी आनंदी वृत्ति नसेल तर दुसऱ्यांबरोबर संपर्क साधणार नाहीं.

विराटाच्या रूपांत श्रीकृष्णच आपल्या बुध्दीमधे प्रकाश आणतात. त्या प्रकाशामधेच मुर्खपणा आणि अडाणीपणा कळून येतो. हे श्रीकृष्णांचे आशीर्वाद आहेत. ते तुम्हाला विराटानंद देतात कारण हा प्रकाश नसेल तर मनांतील वा बुध्दीतील आनंद तुम्ही अनुभवू शकणार नाहीं. या प्रकाशामधेंच आपल्यामधील पूर्णानन्दाचा अनुभव आपल्याला येतो.

आतां आणखी एक प्रकार म्हणजे "हे फार झालं" असं म्हणण्याची पध्दत. कारण आपल्या बुध्दीमध्यें इतकं कांही चुकीचं भरलं आहे की कुणी कितीही सांगितलं तरी डोक्यांत शिरतच नाहीं. सुज्ञ माणूस, श्रीकृष्णासारखा जो सुज्ञपणाचा स्रोत आहे, स्थितप्रज्ञ असला पाहिजे, म्हणजे तो संतुलनात राहणारा व धर्माच पालन करणारा असला पाहिजे, आणि सर्वांत मुख्य म्हणजे तो आनंदी असला पाहिजे. या स्थितीमधें तुम्ही नुसतेच आनंदमय नसता तर सत्याचा, परम सत्याचा अनुभव घेता. हे सत्य जाणल्यानंतरच योग्य काय-अयोग्य काय हे तुम्हाला समजेल, तुमची सुज्ञता वाढेल, नुसतीच बुध्दी नाहीं. बुध्दीमुळें कधीं कधीं चुकीच्या मार्गाला लागून अवाजवी किंवा प्रौढी मिरवण्याच्या कल्पना केल्याचं तुम्ही ओळखू शकात अशा तऱ्हेनें तुम्ही एक साक्षी बनाल. श्रीकृष्ण म्हणालेच होते "मी सर्व सृष्टीचा साक्षी आहे."

आपण कुठं चुकत आहोत व श्रीकृष्ण आपल्याला कसं तारतात हें आपण समजून घेतलं पाहिजे. अर्थात दिवसें दिवस आपण अधिकधिक सुज्ञ बनलं पाहिजे. सुज्ञतेमुळे आपण कसं असायला हवं याची तुम्हाला खरी कल्पना येते. तुमचं हास्यसुध्दां श्रीकृष्णासारखं होईल. आपली विशुध्दि ठीक राहिली पाहिजे हे आपण लक्षांत घेतलं पाहिजे. निदान थोड्या सहजयोग्यांनी स्वतःची विशुध्दि ठीक ठेवली तरी माझी तब्येत बरीच चांगली राहील.

तुम्ही सर्वजण आता विशेष लोक आहांत. परमेश्वराकडून आशीर्वादित आहात, तुमच्यामधे श्रीकृष्ण त्यांच्या पूर्ण शक्तिने आणि तेजाने जागृत झाले आहेत. आतां आपल्याला काय करायचं आहे हे तुम्ही जाणायला हवं. प्रत्येकाने संपर्क वाढवला पाहिजे. पण लोक नुसतं ध्यानही करत नाहींत असं मी पाहते ध्यान करत असले तर सामुहिकतेत येत नाहींत, संपर्कात रहात नाहींत. कधी कधी संभाषण करतात तेव्हां आपण परमेश्वरच झालो आहोत असं त्यांना वाटतं. मनुष्यप्राणी हा फार गुंतागुंतीचा प्राणी आहे. तुम्ही दुसऱ्याशी वागतांना अगदी मृदु, नम्र राहिलं पाहिजे जसे श्रीकृष्ण होते. रासक्रीडेमधें सर्वांशी हात मिळवून त्यांनी सर्वांना राधेची शक्ती दिली. त्यांचं बालपण जेव्हां त्यांनी खूप राक्षस लोकांना मारलं ते संपले आणि त्यांचा तारुण्यकाल, जेव्हां त्यांना

स्वतःच्याच लोकांना मारावं लागलं ते सर्व संपल आहे.

मग ते राजा झाले.

राज्यपद धारण केल्यावर त्यांनी काय केलं तर संपर्क वाढवला त्यांचं खरं रूप व गुण त्याचा आविष्कार राजा बनल्यावरच झाला. त्यापूर्वी त्यांनी एकमागोमाग दुष्टांचा संहार केला. नंतर त्यानी द्वारका ही राजधानी बनवली आणि लोकांबरोबर संपर्क वाढवू लागले. म्हणून तुमचं कर्तव्य हे की आपली स्थिति उन्नत करायची आणि श्रीकृष्णांच माधुर्य आणि सुशोभिता या गुणांतून संपर्क ठेवायचा त्यावरोबरच आजुबाजुला कोणत्या गोष्टी मूर्खपणाच्या आहेत त्यांचं भान ठेवायचं ते नीट समजल्यावर तसा मूर्खपणा तुम्ही करणार नाही. या अनावश्यक घडामोडींच्यामधें न अडकण्याचा सुज्ञपणा तुमच्यांत येईल. तुम्ही साक्षी बनून जर सर्व पहायचं शिकलात की जे काय होत आहे ते सर्व समजूं शकाल. त्यांना नरकाच्या मार्गापासून आपल्याला परावृत्त करायचे आहे. आपल्या प्रत्येकाला एक आदर्श सहजयोगी बनायचं आहे.

तुम्हा सर्वांना.

पुष्कळ वेळा लग्न बरीच होतात आणि अचानक घटस्फोटाचे प्रयत्न चालू होतात. सहज योगांत घटस्फोटाला परवानगी आहे पण त्यात अमेरिकन तऱ्हेचा मूर्खपणा नाहीं, पती किंवा पत्नी दान करतात आणि नंतर घटस्फोट होतो. आपल्या मनोवृत्तीवर अनेक गोष्टींचे परिणाम होत असतात आणि वातावरणाचे पण परिणाम असतात. त्यामुळें हे दोष काढून टाकण्याचा सतत प्रयत्न केला पाहिजे. माझी सर्वांना विनंति आहे की श्रीकृष्णांच्या व्यक्तिमत्वातील सूक्ष्मता समजून घेण्याचा प्रयत्न करा, अतिशय शांत, मृदु, नम्र, कनवाळु आणि प्रेमळ बनण्याचा प्रयत्न करा. श्रीकृष्ण विनम्र स्वभावांत पैशाला कांही स्थान नव्हतं. ते वर्णाने सावळे होते हे तुम्हाला माहीत आहेत. त्यांच्या अनेक गुणांपैकी आपल्यात किती आहेत याचा शोध घ्या. अशा तऱ्हेनेंच आत्मपरीक्षणाला सुरुवात होईल. असं आत्मपरीक्षण करून स्वतःला समजून घ्यायचा जसा प्रयत्न कराल तशी तुमच्यातील सुज्ञता विकसित होईल. दुसऱ्या व्यक्तिमधील दोष काढत बसुन किंवा त्यांच्यावर पांघरूण घालून नाही, तर आत्मपरीक्षणांतूनच हे शक्य आहे. त्यानंतरच कार्यभाग होईल. श्रीकृष्णांना हे करायची जरूर नव्हती कारण ते "संपूर्ण" अवतार होते. आपल्याला हे करायला हवं तरच आपण त्यांच्यासारखे पूर्ण बनू.

आणखी एक गोष्ट मला सहजयोग्यांसाठी सांगावीशी वाटते ती म्हणजे आपण भारतीय शास्त्रीय संगीत शिकवणं सुरु केलं पाहिजे कारण त्यामुळें चैतन्य-लहरी सुधारतात पाश्चात्य लोकांच्या स्वभाव असा आहे की कुठलीही गोष्ट करायला घेतली की त्याचा अगदी तडा लावतात जोपर्यंत तेच त्यामधें हरवून जात नाहींत संगीतानें असे भान हरपलेले लोक पाहून मला आश्चर्य वाटलं. त्यालाकाही विशीष्ट प्रसंग असायला हवा. ते लोक संगीतात रमले की जणुं दुसऱ्याच जगांत वावरत असतात. असं करू नका. तुम्ही प्रत्येक बाबतीत अगदीं टोकाला जाता हे योग्य नाही. पुजेच्या वेळीसुध्दां तुमचं असंच होतं. टोकाला जाण्याच्या या संवयीमुळे तुम्ही संतुलनांत रहात नाहीं, तुम्ही श्रीकृष्णांबरोबर रहात नाही

खरं म्हणजे आपल्याच संवयीनुसार आपण जग जसं दिसतं तसं समजतो. कांहीना जग संगीतमय वाटतं, कांहींना जग हा नृत्याचा आभास होतो, कांहींना आपल्या पलीकडे इतर जग असल्याचं वाटत नाहीं. "आमच्यावर श्री माताजींची विशेष कृपा आहे" असं कांही समजतात हे बऱ्याच वेळीं चालतं माझं तसं कुणाशीही विशेष नात असं नाहीं. कुणाचंही माझ्याशी वेगळं असं नात असूं शकत नाहीं. हे मी तुम्हांला अगदी खडसावून सांगत आहे. तुम्ही कोणीही तसा अधिकार गाजवूं नका.

***

# सरस्वती पूजा

## परम पूज्य माताजींच्या १४-१-८३ रोजी धुळे येथे केलेल्या इंग्रजी भाषणाचा अनुवादः

सर्व प्रकारचे सृजनशील कार्य प्रेमानेच घडून येत असते. राअुळबाअींचे माझ्यावर किती प्रेम आहे ते तुम्ही बघतच आहात. या ठिकाणी तुम्हाला सुध्दा काही तरी सुंदर गोष्टी करण्याच्या नवीन कल्पना आल्या आहेत. जसे प्रेम वाढेल तशी तुमची सृजनशीलता पण वाढेल. सरस्वतिच्या सृजनशील्तेचा पाया प्रेमच आहे. जर प्रेम नसेल तर सृजन पण नाही. थोडेसे खोलवर तरी बघितले तरी सुध्दा तुम्हाला कळेल की ज्यांनी शास्त्रीय शोध लावले त्यांनी सुध्दा जनसामान्याच्या प्रेमातूनच हे सर्व कार्य केले. स्वतःसाठी नाही. स्वतःसाठी कोणी काहीच निर्माण केले नाही. जरी केले असले तरी सुध्दा त्याचा उपयोग सर्वांना झाला आहे. अन्यथा ते निरर्थक आहे. अणू बॉंब किंवा तत्सम शास्त्रीय शोध संरक्षणाकरीताच लावले गेले. ते जर लावले नसते तर त्या लोकानी महायुध्दातून आपले लक्ष काढले नसते. आता महायुध्दाचा कोणी विचारपण करीत नाही. अर्थात शीत युध्द चालू आहे पण ते हळू हळू जसे लोक कंटाळतील तसे संपेल. तेव्हां उजव्या बाजूचे (पिंगला नाडीचे) कार्य मूलतः प्रेमातून सुरू होते व प्रेमानेच त्याची परिणिती होते. ज्याच्या शेवट प्रेमात होत नाही ते कमी कमी होअुन संपुष्टात येते. नाहीसे होते. तेव्हां तुम्हाला हे कळेल की जड गोष्टी सुध्दा जर प्रेमासाठी अुपयोगात आल्या नाहीत तर नाहीश्या होतात. प्रेमाचे अधिष्ठान पाहिजेच. नाहितर जे काही आपण जडातून निर्माण करतो. ते जर जनसामान्यांना आवडले नाही, त्यांचे पासून निराळे राहिले, तर ते हळूहळू, त्याला काही काळ निश्चितच लागेल, पण त्याची दिशा ठरलेलीच असते, नष्ट होणारच.

आता हे प्रेम आहे. इश्वराचे महान प्रेमाबद्दल आपण बोलतो त्याची आपल्याला चैतन्य लहरीतून जाणीव होते. लोकांचे कडे चैतन्य लहरी नसतात. पण त्यांचे नकळत त्यांना संवेदना होत असतात. जगातील सर्व महान तैल चित्रा मधून चैतन्य लहरी येत असतात. जगातील सर्व सृजनशील निर्मितीला चैतन्य लहरी असतात. अणि चैतन्य लहरी असलेल्या गोष्टीच काळाने टिकवून ठेवल्या आहेत. बाकीच्या नष्ट केल्या आहेत. किती तरी भयानक व गलिच्छ गोष्टींची निर्मिता अनेक वर्षापूर्वी सुध्दा झाली होती. परंतू निसर्गाने त्या केव्हाच नाहीशा केल्या. कालाच्या विनाशकारी शक्तींच्या तडाख्यातून त्या बचावल्या नाहीत. तर जे काही टिकाव धरणारे आहे. पोषक आहे. अुदाततेची भावना जागृत करणारे आहे ते सर्व प्रेमाच्या भावनेतून निर्माण होते. आपल्यामधे ती भावना वृध्दिंगत झालेली आहे अितरामधे नाही. तरी सुध्दा सर्व जगाला हे लक्षात घेतलेच पाहिजे की मानवाला अिश्वराच्या सर्वोच्च

प्रेमाकडेच जायचे आहे अन्यथा त्याला काही अर्थ नाही.

आता तुम्ही हे बघताच की, कले मधे लेकांना आकर्षित करण्यासाठी, अगदी हीन व गलिच्छ पध्दतींचा वापर केला जातो, केवळ हीच कला आहे हे लेकांना पटावे म्हणून परंतु ते नाहीसे होणारच. मी सांगितले तसे. काळाच्या तडाख्यातून ते बचावणार नाही. कारण काळ ते नष्ट करेल. ते सर्व नाहीसे होणारच आणि तुम्ही परिणाम बघतच आहात की सगळीकडे, अगदी पश्चिमेकडे सुध्दा, कसे बदल घडून येत आहेत. तेव्हां पश्चिमी जगाबद्दल अगदी निराश होउन पश्चिम म्हणजे टाकावू असे समजण्याचे कारण नाही. तेथे सर्व ठीक होईल आणि ठीक झाले पाहिजे. कारण विशेषत: पश्चिमेकडे सरस्वतीची बरीच पूजा झाली आहे. भारता पेक्षा किती तरी जास्त. कारण तिकडे ते स्वत:च शिकले व पुष्कळ गोष्टी शोधुन काढल्या. फक्त ते येवढच विसरले की, अिश्वरच, देवीच सर्व धर्म आहे सर्व काही देवाकडूनच येत असते. हेच ते विसरले, आणि म्हणून सर्व प्रश्न निर्माण झाले जर तुमच्या शिक्षणामधे आत्माच नसेल. जर त्याचा अुगम देवीकडून झालाच नाही तर सर्व निरूपयोगीच असणार, त्यांनी तर हे लक्षात घेतले असते की आत्माच सर्व घडवून आणतो तर ते अितक्या पराकोटीला गेलेच नसते. भारतीयांना सुध्दा मी आतापर्यन्त तेच सांगत आले आहे की अेक प्रकारे तुम्ही औद्योगिक गुंतागुंती टाळण्यासाठी तुम्ही आत्म्याला जाणले पाहिजे. जर तुम्ही आत्मा जाणत नसाल तर त्या लोकांसारखेच प्रश्न तुमच्या पुढेहि येतील. कारण ते मानव आहेत आणि तुम्हीहि आहात आणि तुम्ही त्याच मार्गानी जाल तुम्ही सैरवैर धावत सुटाल आणि पाश्चिमात्य लोकाना जे त्रास सहन करावे लागतात तेच तुम्हालाहि सहन करावे लागतील.

आता, सरस्वतीचे आशिर्वाद अितके आहेत की थोड्या वेळात त्यांचे वर्णन करणे अशक्य आहे. आणि सुर्याने सुध्दा अपल्याला अितक्या शक्ति दिलेल्या आहेत कि अेकाच काय पण दहा भाषणामध्ये सुध्दा त्यांचे बद्दल सागणे अशक्य आहे परंतु सरस्वतीची पूजा करताना आपण सूर्याचे विरूध्द आणि सरस्वतीच्या विरूध्द आपण कसे वागत असतो हे आपण स्वत:मध्ये पूर्णपणे जाणून घेतले पाहिले. अुदारहाणार्थ पाश्चिमात्य लोकाना सूर्याची आवड फार आहे कारण तिकडे सूर्य दिसतच नाही परंतु ते त्याचे साठी अगदी अतिरेकाला जातात आणि स्वत:मध्ये सूर्याचे बाबतीत गुंतागुतीचे प्रश्न निर्माण करून ठेवतात. परंतु सुर्याचे पासून अेक मुख्य गोष्ट आपण शिकली पाहिजे ती म्हणजे विवेक, म्हणजेच अंतरिक प्रकाश. जर आज्ञा चक्राच्या सूर्य चक्रावर भगवान येशू स्थानापन्न झाले असतील तर जीवनांत नीतिमत्ता आणि पावित्र्य असणे अत्यंत आवश्यक आहे. नीतिमत्ता पश्चिमेकडे लोक वादाचा विषय झाला आहे. लोकांना नीतिमत्तेची काही जाणीवच नाही चैतन्य लहरी वरती अर्थातच तुम्हाला ते समजते, परंतु ते लोक मात्र अगदी नीतिच्या विरुध्द गेले आहेत. जे येशूची पूजा करतात. सरस्वतीची करतात, सूर्याची करतात ते सूर्याच्या शक्तीच्या अगदी विरूध्द गेले आहेत. अगदी त्याची ते अवज्ञा करतात. प्रत्येक गोष्ट स्वच्छदिसून येण्यासाठी केवळ सूर्यच प्रकाश आणतो. किती तरी गुण सूर्याकडे आहेत. तो गलिच्छ ओल्या गोष्टी वगैरे वाळवून टाकतो, जिथे जिथे जंतू निर्माण होतील ते सर्व तो वाळवून टाकतो पण पश्चिमेकडे किति तरी बांडगुळे निर्माण झाली आहेत. नुसती बांडगुळेच नव्हेत तर किती तरी भयानक पंथ आणि किती तरी भयानक गोष्टी तिथे निर्माण झाल्या आहेत, जे देश पूर्ण प्रकाशित असायला हवेत ते किती गहन अंध:कारात रहात आहेत, जिथे लोकांना प्रकाशाची आवड असायला हवी तेथे अनर्यामीचा अंधार, स्वत:च्या ज्ञानाबद्दलचा अंधार आणि प्रेमा बद्दलचा अंधार भरून राहिले आहेत. प्रकाशाचा अर्थ तुमच्या स्थूल दृष्टिस दाखविणारा प्रकाश नव्हे तर

अंतर्यामीचा प्रेमाचा प्रकाश होय. तो अितका सुंदर, अितका मोहिनी घालणारा अितका सुखदायी आहे आणि भरपुर आहे कि जर ह्या पवित्र प्रेमाच्या, पावित्र्याच्या, पवित्र नात्याच्या, पवित्र ज्ञानाच्या प्रकाशाचा अनुभव तुम्ही अंतर्यामी घ्याल, जर तुम्ही तो प्रकाश आपल्या अंतर्यामी वृध्दिगंत कराल , तर सर्व काही अगदी निखळ स्वच्छ होअुन जाअील. " मला जितके धुवाल तितका मी बर्फा पेक्षाहि जास्त शुभ्र होअीन." असे तुमच्या बाबतीत होअील. निसर्गाचे शुध्द स्वरुप आपल्यामधे निर्माण होते आपले चक्रे ह्या विशुध्द निसर्गाच्या स्वरुपातुनच बनली आहेत. आपणच आपल्या विचारांनी ती मलिन करतो. सरस्वतीच्या शक्तिच्या किंवा सरस्वतीच्या विरुध्दच तुम्ही वागत असता. सरस्वती निसर्गामधील जे, जे अपवित्र आहे ते ते स्वच्छ करित असते आणि आपण आपल्या मेंदुच्या कार्यानी ते खराब करत असतो. आपल्या मेंदूचे सर्व काम विशुध्द बुध्दिमत्तेच्या विरोधी असते. आणि हेच आपण जाणले पाहिजे की ही विशुध्द बुध्दी आपल्या विचारांनी मलीन होता कामा नये. आपले विचार आपल्याला अितके अहंकारी व अपवित्र बनवितात की आपण विष खावून वर विचारु की "त्यात काय चुकले?" अगदी सरस्वतिचे विरोधी. जर सरस्वति आपल्या मधे असेल तर ती आपल्याला शहाणपण देते, सुबुध्दी देते, म्हणून सरस्वति पूजा करण्यासाठी, सूर्याची पूजा करण्यासाठी, आपल्याला काय बनायचे आहे आणि आपण काय करित आहोत, कोणत्या घाणीत आपण रहात आहोत. आपले मन कोणीकडे भरकटते आहे. याची पूर्ण दृष्टी आपल्याला आली पाहिजे. आपण विमुक्त होण्यासाठी, येथे आलो आहोत, आपल्या अहंकाराचे लाड पुरविण्यासाठी किंवा आपल्या मधे असलेली घाण सांभाळत रहाण्यासाठी नाही, तेव्हां हा प्रकाश आपल्यामध्ये आला आहे आणि आपण आपल्या भोवताली निर्माण केल्या जाणाऱ्या आपल्याच मानसिक गलिच्छपणाच्या वर अुठण्याचा प्रयास केला पाहिजे. या शिवाय तुम्हाला आणखी अुंच वाढून हे समजून घेतले पाहिजे की तुमच्यामध्ये अहंकार नावाची अेक गोष्ट आहे आणि हा अहंकार म्हणजे केवळ असत्य आहे. तुम्ही काहीच करत नाही. जेव्हां तुमची नजर अिकडे तिकडे जात असते, ज्या वेळी तुमचे चित्त भरकटत असते, त्यावेळी तुमचा अहंकार तुमच्यावरच प्रयत्न करीत असतो. खरे म्हणजे, अहंकार अगदी खोटा असतो फक्त अेकच अहंकार व तो म्हणजे अीश्वर, महत-अहंकार, दुसरा अहंकार नाही. ती केवळ कल्पना आहे. ते अेक फार मोठे असत्य आहे. कारण तुम्हाला वाटू लागते की, तुम्हीच प्रत्येक गोष्ट करत असता, हे करत असता, वास्तविक तुम्ही काहीच करत नाही. मग हा मुर्खपणाचा अहंकार वाढू लागतो आणि प्रत्येक बाबतीत तो दिसून येतो जेव्हा तो पुढे येअु लागतो तेव्हां तो दुसऱ्यावर मात करायचा प्रयत्न करतो आणि हिटलर सारखा होतो. अुजव्या बाजूला गेल्यावर तो सुपरा कॉनशस होतो आणि त्याला सर्व वेडगळपणाच्या गोष्टी कराव्याशा वाटतात. डाव्या बाजूला गेल्यावर तो स्वतःला आपण फार मोठी व्यक्ति आहोत कोणी पशु आहोत किंवा देवी आहोत किंवा आदि गुरू आहोत वगैरे समजु लागतात, अहंकार मागे गेल्या नंतर मात्र तो फार धोकादायक होतो, असे लोक गुरू बनतात आणि दुसऱ्याला नष्ट करतात त्यांचे स्वतःमध्ये पुष्कळच दोष असतात आणि मग ते लोकांना नरकात ओढतात. जेव्हा अहंकार सर्व बाजूने जावू लागतो तेव्हां तो नर्क होतो.

आता लोक जेव्हा अुजव्या विशुध्दिचा वापर करतात म्हणजे स्वतःबद्दल बोलतात ते सगळ्यात वाअीट होय, कोणचा कां अहंकार तुमचा असेना जर तुम्ही त्याचे बद्दलबढाया मारायला लागाल तर तो सर्व बाजूने घेरेल आणि मग अहंकाराच्या भिंती अितक्या जाड होतिल की त्याचा भेद करणे केवळ अशक्य होअुन बसेल. कारण, असे लोक स्वतःमध्ये अितके मशगुल

असतात आणि आपण तसेच आहेत असा त्यांचा विश्वास असतो. अेकदा का त्याचा असा विश्वास दृढ झाला कि मग त्यांचे मध्ये फरक करणे शक्य नसते, तेव्हां तुम्ही ज्या बढाया माराल किंवा स्वःच्या मोठे पणाच्या गोष्टी कराल तेव्हां संभाळून रहा तुम्हाला माहिती आहे की मी कोण आहे पण मी हे किती वेळा सांगायच कि मी कोण आहे? मी अेकदा सांगितल तरी सुध्दा तुम्हाला किती तरी प्रचंड चैतन्य लहरी मिळतात पण मी ते किती वेळा सांगाव? तुम्ही काही तरी म्हणता आणि मी होकार देते पण ते मी म्हणत नसते. मी स्वःच जर ते मोठ्या आवाजात सांगितले तर काय होईल ते सांगता येत नाही. कदाचित सर्वच फुटून जाईल म्हणून तुम्ही हे समजुन घेतल पाहिजे की महद-अहंकारच सर्व कार्य करतो, सर्व निर्माण करतो, कधी कधी मी तुमच्यावर ओरडते लगेच सर्व भूते पळून जातात फक्त अेकदाच ओरडल्यावर. कालच तुम्ही बघितल की बडबड करणारी सर्व भूते पळून गेली. काल मी तुम्हाला सांगितल की तुम्ही अेक साक्षात्कारी जीव आहात हे लक्षात घ्या आणि तुम्ही सुध्दां असे करू शकाल. तुमच्या अुजव्या विशुध्दिचा वापर स्वतःवर ओरडण्यासाठी करा, "आता तुझे हे मुर्खपणाचे बडबडणे थांबव" आणिमग ते थांबेल, आता जे लोक फार कार्य करणारे आहेत त्यांचे बाबतीच अहंकाराच्या भिंती जाड होतात. त्यांना ह्या बद्दल काही तरी करायच असत ते क्रियाशिल नसतात असे नाही आणि त्यांना कार्य करायचहि असते पण ते जास्त बडबड करत असतात. त्यांच्या हे लक्षात येत नाही कि काही अंतरिक अुपयांनी त्याच्यावर ते जास्त चांगले नियंत्रण करू शकतात. त्यांना ते करायचे नसते. म्हणून ते बडबड करतात आणि अेकदा त्यांनी बोलायला सुरुवात केली का ते स्वतःच्या कार्यबद्दल बोलू लागतात आणि मग सर्व शक्ति निघून जाते ते जर बोलले नाहीत आणि अंतर्मुखराहिले तर ठीक होईल. तुम्ही तुमचे अनुभव मला सांगू शकता ते ठिक आहे. पण जर ते दुसऱ्याला सांगत सुटलात आणि त्याचे बद्दल जास्त बोलू लागलात तर तुमच्या मध्ये जी शक्ति आहे ती हळू हळू निघून जाओील आणि मग तुम्ही अगदी खालच्या पातळीवर येअुन बसता. म्हणून कोणीहि माझ्याकडे ही शक्ति आहे ती शक्ति आहे मी हे करतो ते करतो अशी प्रौढी मारू नये ते अत्यंत चूक आहे म्हणून मी तुम्हाला हे सांगून ठेवते की स्वतःचे मोठेपण दाखविण्याचा प्रयत्न करु नका. तुम्ही माझ्या शक्ति बद्दल बोला ते ठिक आहे पण स्वतःच्या शक्ति बद्दल बोलण्याचा प्रयत्नहि करु नका अर्थात अेखाद्या विरोधी व्यक्तिशी बोलताना किंवा दुसऱ्या कोणाशी बोलताना जरूर पडली तर तुम्ही सांगा पण त्यावेळी तुम्ही म्हणायला पाहिजे, आम्ही, मी नाही, आम्हाला किंवा आमच्या पैकी काहीना, आमच्या मध्ये शक्तिची जाणीव झाली आहे, आम्ही लोक बघितलेत वगैरे कदाचित तुम्ही अेकटेच असाल पण असे म्हणू नका की "मी" "आम्ही म्हणायला पाहिजे तरच तुम्ही महत अहंकार व्हाल. तर, तुम्ही म्हणायला पाहिजे 'आम्ही येथे आमच्यापैकि काही लोक' आम्ही हे करतो असं ग्रेगॉयरच्या पुस्तकामध्ये मी ह्या ची खात्री करुन घेतली की जास्त मी, मी नव्हंत तर आम्ही होते. आम्हाला असं वाटतं आम्ही करतो. तर आम्ही म्हणजे संपूर्ण सहज योग्यांचे अेक सामुहिक व्यक्तित्व सर्वसहजयोग्यांचे सामहिक जिवंत (organism) जेव्हां तुम्ही म्हणता की आमच्या पैकी काहींच्या कडे ते आहे तेव्हां तुम्ही स्वःला खाली समजूत अितरांना तुमचे वर समजता म्हणून प्रत्येकाने असे म्हणायला पाहिजे "आमच्या पैकी काहींच्या कडे हे आहे, हे मला माहिती आहे." जर तुम्हाला तुमच्या अहंकारावर मात करायची असेल तर तुम्ही त्याला प्रत्येका मध्ये पसरु दिले पाहिजे. आणि अशा तऱ्हेने सर्व ठीक होईल ते पसरु द्या. त्यासाठी असे म्हणा " आम्ही सहजयोगी किंवा आम्ही सर्व." परंतु तेथे अभिमान नाही, मी बघितलं आहे.

कि अभिमान नाही अजूनहि आपले बोलणे जास्त करून आत्मलक्षी आहे. जर तुम्ही असे समजू लागलात कि आम्ही सहजयोगी, तर तुम्ही सर्व मिळून अेक व्यक्तिमत्व बनाल अेक संगठन व्हाल

पण, असे होते की, अेकाने दुसऱ्याचा अुपहास केलाच पाहिजे त्यांना असेच दिसणार की हा माणूस लहान, हा मोठा वगैरे असे नाही वाटणार की आम्ही सहजयोगी, आम्ही किती सुंदर आहोत, वगैरे म्हणून कायम. "आम्ही" असे समजूनच वागा म्हणजे तुमचा अहंकार कमी कमी होत जाअील आणि जो अहंकार आता विचित्र आणि हास्यास्पद वाटतो तोच अेकादश रुद्रांपुढे गळून पडेल.

आज वैयक्तिक अहंकार, अेकादशामध्ये मिळून जाअील, परंतु आपण मात्र कायम आम्ही असे धरुन बोण्याचे लक्षात ठेवले पाहिजे म्हणून आजचा दिवस, हा बदल घडवून आणण्यासाठी आपल्या दृष्टिने फार महान आहे कारण आज सूर्याने आपला मार्ग बदलला आहे आता सूर्य ह्या बाजुला, येत आहे. तेव्हां, जिकडे म्हणजे अुत्तरेकडे येणाऱ्या सुर्याचे आपण स्वागत करू या. ऑस्ट्रेलियन्सनी म्हणावे की सूर्य जरी गेला असला तरी सुर्याला सुर्याचे राज्याला आपण आपल्या मधे प्रस्थापित करू या कारण आपल्या अंतर्यामा मधून सूर्य कधीच नाहिसा होत नाही. म्हणून अशा तऱ्हेने धडून आणल पाहिजे की आपण सर्व अेक व्यक्तिमत्व आहोत, आम्ही सर्व अेक आहोत, असे आपल्याला वाटु लागेल. जो कोणी वेगळा व्हावयाचा प्रयत्न करेल तो गळून पडेल, त्याला मी काढून टाकेन. काहिहि असो, तो जाअील, तेव्हां अेकदा आत्मपरिक्षण करा आणि बघा की कोण स्वतःला वेगळे करण्याच्या प्रयत्नात आहे प्रत्येकाने जसे पचेल तसे सामुहिकता वाढविण्याचा, सामुहिक अुध्दाराचा; सर्वांना मदत करण्याचे कार्य करणे आवश्यक आहे. परंतु कोणालाहि, कोणत्याहि मार्गाने खाली ढकलण्याचा प्रयत्न करू नका, कारण सहज योगाचा हा मार्ग नव्हे. सहज योगाचे कार्य सामुहिकतेवरच होत असते. ज्याने हा सर्वात्मक होण्याचा भाव जोपासला आहे तोच खरा सहजयोगी होय. ज्याने नाही वाढविला, तो नाही. स्वतःबद्दल तुम्हाला काहीहि वाटो मला काही त्याबाबत म्हणायचे नाही. परंतु तुमचे व्यक्तिमत्व सर्वांमध्ये सामावलेले, अेकमेकांमध्ये मिसळण्याचा प्रयत्न करा आणि त्यामध्ये सौंदर्य बघून आनंद मिळवा. तुमची आअी जशी सर्वांमध्ये समावलेली आहे. मी तुम्हाला भेटते किंवा नाही ह्याने काही फरक पडत नाही पण मी तुमच्या मध्येच मिसळलेली आहे. अगदी छोट्या गोष्टी मधुन सुध्दा मी तुमच्या जवळ असते. तसे तुम्ही होण्याचा प्रयत्न करा. ती सर्वात मोठी गोष्ट प्राप्त करून घ्यावयाची आहे. अहंकार तुम्हाला अेखाद्या शिंगांच्या टरफला सारखा बनवितो आणि सर्वात्मक होण्याच्या सौंदर्याशी तुमचा संपर्क पोहोचु देत नाही आता हे सूर कसे अेकमेकांमध्ये हलत असतात.

आज धुळे येथे पूजा होत आहे. ही फारच महान कल्पना आहे व महान गोष्ट आहे धुळे म्हणजे धूळ. माझ्या लहानपणी मी अेकदा कविता लिहिली होती मला आठवतय ती फारच आवडण्या सारखी होती ती आता कुठे गेलीय ते मला माहित नाही. पण ती अशी होती. "मला अेखाद्या धूळीच्या कणा सारखे लहान व्हायचे आहे कि जे वाऱ्या बरोबर अुडते आणि सगळीकडे जाते. ज्याला सुवास आहे. जे पोषक आहे आणि जे प्रकाशित करते" अशा तऱ्हेने मी अेक मोठी सुंदर कविता लिहिली होती. मला आठवतय मी सात वर्षांची होते. "मला धुळीचा कण व्हायचय मला अगदी स्पष्ट आठवतय खूप वर्ष झाली. त्याला." मला धुळीच्या कणासारख व्हायचय म्हणजे मी लोकांमध्ये मिसळीन." अशा तऱ्हेचा धूळीचा कण होणं हीअेक फारच महान गोष्ट आहे. ज्याला तुम्ही स्पर्श कराल ते सचेतन करणारं होअील



पुढील मजकूर मागील पानावर

ज्याचा तुम्ही अनुभव घ्याल तो सुवासच असेल. अशा तऱ्हेने होणे ही अितकी मोठी गोष्ट आहे. माझी जशी अिच्छा होती आणि ती आता फलद्रुप होअील. त्या लहान वया मध्ये मला धूळीचे कण बनण्याची कल्पना सुचली आणि तुमच्याशी बोलताना आज मला त्याची आठवण झाली. आज मला आठवण झाली की, मला धूळीचे कण व्हायच होत आणि हे स्थान पण तसेच आहे राअुळबाअी पण तश्याच आहेत. त्या अतिशय साध्या. अगदी साध्या स्त्री आहेत आणि अगदी साध्या व्यक्ति सारख्याच त्या रहातात. त्यांच्याकडेहि सर्वात्मकतेची जाणीव आहे. काल येथे बरेच सहजयोगी आले होते आणि मला खात्री आहे की ते लोक सहजयोग चांगला अंगिकारतील. धुळ्यात पुष्कळ सहजयोगी आहेत आणि पुष्कळ होतीलहि तुम्ही बहूतेक सगळ्यांना भेटला असालच त्यांच्याशी मैत्री करा ते कोण आहेत ते जाणून घ्या. त्यांना कदाचित अिंग्लिश येणार नाही. कुणातरी रुपांतर करण्यासाठी बरोबर घ्या त्यांच्याशी बोला त्यांच्याशी चांगले वागा आणि मैत्री करा. अेकमेका मध्ये मिसळण्यासाठी तुम्ही त्यांना भेटावं असं मला वाटतं तुम्हाला हे माहिती पाहिजे की हे लोक कोण आहेत, नाशीकचे लोक कोण आहेत, कारण खऱ्या अर्थांनी आपण त्या, त्या ठिकाणच्या सहजयोग्यांना कधी भेटतच नाही, आणि परत गेल्यावर आपल्याकडे अेकदोघांचेच पत्ते असतात. ही काही चांगली कल्पना नाही. म्हणून किती लोक आहेत ते बघायचा प्रयत्न करा. त्यांचे बद्दल प्रश्न विचारा आणि किती तरी गोष्टी करता येतील तेव्हां तुमचा अहंकार सर्व ठिकाणी अेकरूप होअील तेव्हांच हे मिसळणे शक्य होअील अुजव्या बाजूचे प्रश्न सोडविण्याचे हा अेक उपाय आहे आणि अशा तऱ्हेने सरस्वतीची पूजा केली पाहिजे, कारण, सरस्वतीच्या हातात विणा आहे, आणि विणाहे आद्य वाद्य आहे. ज्याच्यावर सरस्वती संगीत वाजवते आणि ते संगीत तुमच्या हृदयात जाते. ते तुमच्या मध्ये जसे जाते आणि कसे कार्य करते हे तुम्हाला कळत नाही, म्हणून सहजयोगी व्यक्तिंनी संगीता सारखे पसरले पाहिजे. असे किती तरी सरस्वतीचे गुण आहेत कि जे अेका व्याख्यानात सांगता येत नाहीत. पण तिचा सर्वात महान गुण म्हणजे ती सूक्ष्मात परिणत होते. जसं पृथ्वीची परिणिती सुगंधात होते संगिताच्या रागा मध्ये होते अशा तऱ्हेने जे काही ती निर्माण करेल त्याची परीणिती अतिशय महान होते.

ज्या काही जड गोष्टींची निर्मिती ती करते ते अतिशय सौंदर्य संपन्न होतं जर जडा मध्ये सौंदर्य नसेल तर ते अतिशय स्थूल होते. अगदी सर्वसामान्य गोष्टी सारखे. आता तुम्ही म्हणाल कि पाणी काय आहे? पाणीच गंगा नदी बनते. ह्याच सुक्ष्म गोष्टी आहेत. म्हणून जड गोष्टी सुध्दा सुक्ष्मात जातात. कारण त्यांना सर्वात मिसळायचे असते. अगदी प्रत्येक गोष्टीत मिसळायचे असते, मग ते काहीहि असो सर्वात अुत्तम म्हणजे हवा ती हवा चैतन्य लहरी बनते. अशा तऱ्हेने तुमच्या लक्षात येअील कि जे काही जड गोष्टी मधून आलेले आहे किंवा पंच महाभुतामधून आले आहे ते कसे सुक्ष्म बनते. अर्थात डाव्या आणि अुजव्या बाजूच्या नाड्या हे घडवून आणतात कारण प्रेमालाच हे घडवून आणायचे असते आणि जेव्हां प्रेम जड गोष्टीवर कार्य करते तेव्हां जड प्रेममय होते. अशा तऱ्हेने आपल्याला आपल्या जीवनाकडे बघितले पाहिजे म्हणजे ते प्रेम आणि जड यांचा सुंदर मिलाप होअील.

तुम्हाला अिश्वराचे अनंत आशिर्वाद.

卐 卐 卐 卐 卐



सहजयोगी सभासदांसाठी विनामुल्य